ePaper

## भाजपचा '400 पार' दावा 'मूर्खपणाचा' : मल्लिकार्जुन खरगे




॥ वर्ष - 7 । अंक - 338 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 29 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**

- बांगलादेशी घुसखोरांना मुसक्या!
- आमदार रविंद्र धंगेकरांनी काढले
- गृहमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा!
- बाबरच्या डोक्यात हवा शिरली!


## आरोपी बापलेकाला 31 मे पर्यंत पोलिस कोठडी

# पैशांचा माज अजूनही गेला नाही!

### अगरवाल बाप-लेकाकडून उडवाउडवीची उत्तरे, तपासात असहकार्य

। पुणे । महाईन्यूज

**कल्याणीनगर अपघात प्रकरणात कारचालक अल्पवयीन मुलाच्या बापाने व आजोबाने चालकाला डांबून ठेवलेल्या बंगल्यातील 'सीसीटीव्ही' चित्रीकरणात छेडछाड केल्याचे प्रथमदर्शनी दिसत असून, त्याबाबत आरोपी तपासात सहकार्य करत नाहीत, तसेच त्यांनी चालकाचा मोबाइल फोन कुठे ठेवला याबाबत उडवाउडवीची उत्तरे देत असल्याची माहिती पोलिसांनी मंगळवारी न्यायालयात दिली. त्यानंतर न्यायालयाने आरोपी बापलेकाला ३१ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली.**





'पोर्श' कार भरधाव चालवून तरुण-तरुणीच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाचा गुन्हा आपल्या अंगावर घेण्यासाठी या चालकाचे अपहरण करून त्याचा मोबाइल फोन काढून घेत धमकावल्याप्रकरणी सुरेंद्रकुमार ब्रह्मादत्ता अगरवाल (वय ७७) आणि विशाल सुरेंद्रकुमार अगरवाल (वय ५०, दोघे रा. बंगला क्रमांक एक, ब्रह्मा सनसिटी, वडगाव शेरी) यांना गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यापैकी सुरेंद्रकुमार याच्या पोलिस कोठडीची मुदत मंगळवारी संपली, तर अल्पवयीन मुलाला कार चालविण्यास दिल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या विशालला या गुन्ह्यात सोमवारी रात्री अटक करण्यात आली. या दोघांनाही मंगळवारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. ए. पांडे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी पोलिसांनी गुन्ह्याच्या तपासाबाबतची माहिती न्यायालयात दिली.

### अपहरणासाठी वापरलेली कार जप्त

या प्रकरणी अगरवाल कुटुंबियांचा चालक गंगाधर शिवराज हेरीक्रूब (वय ४२) यांनी तक्रार दिली आहे. अपघाताच्या घटनेनंतर आरोपी सुरेंद्रकुमार व विशालने चालकाचे अपहरण करण्यासाठी वापरलेली कार जप्त करण्यात आली आहे. याशिवाय आरोपींनी चालकाला धमकावून त्याचा मोबाइलही काढून घेतला होता. त्याबाबत विचारणा केली असता, ते उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. हा मोबाइल जप्त करायचा आहे, तसेच आरोपींना आणखी कोणी माहिती दिली आहे का, याबाबत तपास करायचा आहे, असे खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक व तपास अधिकारी प्रताप मानकर यांनी न्यायालयात सांगितले.

### बाप-लेकाकडे एकत्रित तपास

या गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून, त्याचा सखोल तपास गरजेचा आहे. या गुन्ह्यात विशाल अगरवालला सोमवारी अटक करण्यात आली असून, या दोघांकडे एकत्रित तपास करायचा आहे, तसेच इतर व्यक्तींचा सहभाग निष्पन्न करायचा आहे. त्यासाठी आरोपींना पोलिस कोठडी देण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकील निलेश लडकत यांनी केला. बचाव पक्षातर्फे ॲड. प्रशांत पाटील यांनी बाजू मांडली.

## सुप्रिया सुळे यांच्यामुळे लोकं पक्ष सोडताहेत

### तरुण तडफदार महिला नेत्याचे गंभीर आरोप

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरदचंद्र पवार पक्षाच्या तरुण तडफदार महिला नेत्या सोनिया दुहान यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुप्रिया सुळे आमच्या नेत्या बनू शकल्या नाहीत. सुप्रिया सुळे आमच्या नेत्या बनू शकल्या नाहीत. त्यांच्यामुळे आणि त्यांच्या आजूबाजूच्या काही लोकांमुळे आमच्यासारखे जे एकनिष्ठ लोक आहेत, जे शरद पवार यांच्यासाठी काहीही करायला तयार आहेत, ते लोक निर्णय घेत आहेत आणि पक्षाला सोडून जात आहेत, असं वक्तव्य सोनिया दुहान यांनी केलं.**



नेत्यांना पक्षातून हटवण्याचं काम सुरू आहे तर सुप्रिया सुळे यांच्या बाजूचे लोक कारस्थान रचत आहेत, असा गंभीर आरोपही सोनिया दुहान यांनी केला. पुढे त्या असंही म्हणाल्या, 'मी आजपर्यंत पक्ष सोडला नाही. पण मी खूप लवकरच पक्ष सोडण्याचा निर्णय घेणार आहे. मी दुसरा कोणत्या पक्षात प्रवेश करणार नाही. तुम्हाला वाटेल की, मी उद्या अजित पवार गट, भाजप किंवा काँग्रेस पक्षात जाईन, तर तसं नाही. मी कोणत्याही पक्षात जाणार नाही. मी सध्या कोणताच निर्णय घेणार नाही. सुप्रिया सुळेंच्या आजूबाजूला काही लोक असे आहेत जे पक्षाचं काम करणाऱ्या नेत्यांना संपवण्याचे आणि हटवण्याचे आणि मजबूर करण्याचं काम करत आहेत. पक्ष सोडावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत', असा गंभीर आरोप करत त्यांनी सुळेंवर हल्ला चढवला.

नेत्यांना पक्षातून हटवण्याचं काम सुरू आहे तर सुप्रिया सुळे यांच्या बाजूचे लोक कारस्थान रचत आहेत, असा गंभीर आरोप सोनिया दुहान यांनी केला. पुढे त्या असंही म्हणाल्या, 'मी आजपर्यंत पक्ष सोडला नाही.

### सुप्रिया सुळे आमच्या 'लीडर' होऊ शकल्या नाहीत

"मी मुंबईत आले आहे कारण धीरज शर्मा, मी आणि इतर असे अनेक लोक आहेत जे शरद पवारांसाठी निष्ठेने काम करत आहेत. त्यांच्यासाठी शरद पवारांचा शब्द अंतिम आहे. असे सगळेजण आज शरद पवारांचा पक्ष का सोडत आहेत? किंवा वेगळा निर्णय का घेत आहेत? आत्ता कुणाचं सरकार आलेलं नाही. आज निवडणूक नाही. कुणाला डॅमेज करण्याचा हा प्रश्न नाही. मी जबाबदारीने काम करते आहे त्यामुळे मी हे सगळ्यांच्या वतीने हे प्रश्न उपस्थित करते आहे.

# आमदार रविंद्र धंगेकरांनी काढले

# ‘अत्यवस्थ’ ‘ससून’वर मौनाचा ‘उपचार’!

## वैद्यकीय शिक्षण सचिवांपासून अधिष्ठात्यांपर्यंत सगळ्यांचे तोंडावर बोट

। पुणे । महाईन्यूज ।

**ससून सर्वोपचार रुग्णालयातील गैरप्रकारांची मालिका गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. मात्र, या गैरप्रकारांनंतर वैद्यकीय शिक्षण विभागासह रुग्णालय प्रशासनाने प्रत्येक वेळी कारवाई करण्याऐवजी मौन धारण करण्याची भूमिका घेतली आहे. आताही रुग्णालयातील दोन डॉक्टरांना अटक झाल्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे यांच्यासह रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी तोंडावर बोट ठेवले आहे.**




ससून रुग्णालयातील गैरप्रकार वाढत असल्याने रुग्णालयातील गैरकारभार वारंवार समोर येत आहे. त्यामुळे रुग्णसेवेपेक्षा ससून वेगळ्याच कारणांसाठी चर्चेत येत आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपण रॅकेट प्रकरणात तत्कालीन अधीक्षक डॉ. अजय तावरे यांना पदावरून हटविण्यात आले होते. त्या वेळी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. काळे होते. त्यानंतर डॉ. काळे यांची बदली झाली. डॉ. काळे यांची गेल्या वर्षी पुन्हा अधिष्ठातापदी नियुक्ती झाली. त्यानंतर महिनाभरात डॉ. काळे यांनी डॉ. तावरेंची अधीक्षकपदी पुन्हा नियुक्ती केली. डॉ. तावरे यांच्याकडे न्यायवैद्यकशास्त्र विभागाच्या प्रमुखपदाचा कार्यभार असतानाही त्यांच्याकडे अधीक्षकपद सोपविण्यात आले. त्या वेळी वैद्यकीय शिक्षण विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी या नियुक्तीला आक्षेप घेतला होता. कारण डॉ. तावरे यांना मूत्रपिंड प्रत्यारोपण रॅकेट प्रकरणात अद्यापपर्यंत ‘क्लीनचिट’ मिळालेली नाही. रुग्णालयातील अतिदक्षता विभागात रुग्णाला उंदीर चावल्याचे प्रकरण यंदा एप्रिलमध्ये घडले आणि डॉ. तावरेंचे अधीक्षकपद काढून घेण्यात आले. वैद्यकीय शिक्षण आयुक्तांनी थेट आदेश काढून ही कारवाई केली होती. त्यावर कार्यवाही करण्याऐवजी डॉ. काळे यांनी डॉ. तावरे यांनी पद सोडू नये, असा आदेश सुरुवातीला काढला. नंतर त्याच दिवशी अधीक्षकपद सोडून डॉ. यल्लाप्पा जाधव यांना पदभार सोपविण्याचा आदेश डॉ. काळे यांनी दिला. एवढ्यावरच न थांबता, ‘डॉ. जाधव यांच्या नियुक्तीचा पुनर्विचार करावा,’ असे गोपनीय पत्रही डॉ. काळे यांनी वैद्यकीय शिक्षण आयुक्तांना लिहिले होते. त्यामुळे डॉ. काळे हे डॉ. तावरेंना पाठीशी घालत असल्याची चर्चा ससूनमध्ये सुरू आहे.

आता डॉ. तावरे यांना कल्याणीनगर अपघातातील रक्त नमुन्यांची अदलाबदल केल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी डॉ. काळे यांनी मौन धारण केले आहे. पोलिसांनी याबाबत आपल्याला कळविले नाही, अशी भूमिका त्यांनी सुरुवातीला घेतली. ससूनमधील वाढत्या गैरप्रकारांबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे यांच्याकडे विचारणा केली असता, या मुद्द्यावर बोलण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे ससूनमधील वाढत्या गैरप्रकारांबाबत वरिष्ठ पातळीवरूनच मौन धारण करण्यात आल्याचे समोर आले आहे.

### वैद्यकीय शिक्षण विभागात राजकारणाला जोर

वैद्यकीय शिक्षण विभागात मागील काही काळापासून दोन गट पडले आहेत. हे दोन्ही गट एकमेकांवर कुरघोड्या करीत आहेत. या कुरघोड्यांच्या केंद्रस्थानी दुर्दैवाने ससून रुग्णालय आहे. ससून रुग्णालयाच्या अधिष्ठातापदी आपल्या गटातील व्यक्तीची नियुक्ती व्हावी, यासाठी प्रत्येक वेळी मोर्चेबांधणी केली जाते. त्याचबरोबर एकमेकांची जुनी प्रकरणे उकरून काढून लक्ष्य करण्याचे प्रकार सुरू आहेत. रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक नेमण्यावरूनही एकमेकांवर कुरघोड्या केल्या जात आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### ससून’मध्ये दररोज 24 रुग्णांचा मृत्यू!

पुणे : ससून सर्वोपचार रुग्णालयात दिवसाला २४ रुग्णांचा मृत्यू होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. रुग्णालयात गेल्या वर्षभरात ८ हजार ८७५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात गैरप्रकार वाढत असून, प्रशासनाचे रुग्णसेवेकडे दुर्लक्ष होत आहे. राज्यातील सरकारी रुग्णालयांत गेल्या वर्षी झालेल्या रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी माहिती अधिकारांतर्गत सामाजिक कार्यकर्ते संतोष घोलप यांनी मागविली होती. त्याला सार्वजनिक आरोग्य विभागाने उत्तर दिले आहे. त्यात २०२३ मध्ये सर्व सरकारी रुग्णालयांत झालेल्या रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी देण्यात आली आहे. त्यात राज्यात सर्वाधिक ८ हजार ८७५ मृत्यू ससून रुग्णालयात झाल्याची नोंद आहे. याबाबत घोलप म्हणाले, ‘ससूनचे प्रशासन रुग्णांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा देण्याऐवजी भ्रष्टाचारावर भर देत आहेत. आता तर रुग्णालयातील दोन डॉक्टरांना अटक झाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याने या प्रकरणी विशेष तपास पथक नेमून चौकशी करावी.

---

# मोसमी वाऱ्याचा वेग मंदावला, पाऊस केरळमध्ये वेळेत दाखल होणार

## पुढील वाटचालही नियोजित वेळेनुसार, हवामान तज्ज्ञांचा अंदाज

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही तासांत मोसमी वाऱ्याचा वेग मंदावला आहे. रविवारपासून (२६ मे) मोसमी वाऱ्यांनी फारशी प्रगती केली नाही. पण, असे असले तरीही चिंतेचे कारण नाही, मोसमी पाऊस केरळमध्ये वेळेत दाखल होईल आणि त्या पुढील वाटचालही नियोजित वेळेनुसार होईल, असे हवामान तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.**



पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे माजी सचिव माधवन राजीवन यांनी एक्स समाजमाध्यमावर दिलेल्या संदेशात मोसमी वाऱ्याचा वेग काहीसा मंदावला आहे. त्यामुळे उत्तर भारताला जून महिन्यात उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागू शकतो, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यांच्या या संदेशानंतर मोसमी वाऱ्याच्या प्रगतीविषयी हवामान तज्ज्ञांमध्ये नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी म्हणाले, ‘रेमल चक्रीवादळामुळे बंगालच्या उपसागरावरील बाष्प बांगलादेश आणि पश्चिम बंगलाच्या दिशेने फेकले गेले आहे. त्यामुळे मोसमी वाऱ्याची बंगाल शाखेची आगेकूच काहीशी मंदावली आहे. मस्करीन बेटांवरून येणाऱ्या नैर्ऋत्य मोसमी वाऱ्याचा वेगही काहीसा कमी झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून मोसमी वाऱ्याची आगेकूच मंदावली आहे. तरीही मोसमी वारे केरळमध्ये वेळेत दाखल होतील आणि पुढील वाटचालही नियोजित वेळेनुसार होईल.’

हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे म्हणाले, ‘मस्करीन हाय म्हणजेच आफ्रिकेतील मस्करीन बेटांवरून येणाऱ्या वाऱ्याचा वेग मंदावला आहे. पण, ही एक हवामानविषयक प्रणाली आहे. त्यामुळे वाऱ्याचा जोर कोणत्याही क्षणी वाढू शकतो. केरळमध्ये मोसमी पाऊस वेळेत दाखल होईल.’

### ओमानवर कमी दाबाचे क्षेत्र

ओमानच्या किनारपट्टीजवळ अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. त्याचे तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास अरबी समुद्रातील बाष्पयुक्त हवा ओमानकडे ओढली जाऊन मोसमी वाऱ्याच्या प्रगतीत काहीसा अडथळा निर्माण होऊ शकतो. पण, त्या बाबतचा ठोस अंदाज व्यक्त करण्यासाठी एक- दोन दिवस वाट पाहावी लागेल, असेही माणिकराव खुळे म्हणाले.

# बांगलादेशी घुसखोरांना मुसक्या!

## पाच जणांना अटक : पिंपरी- चिंचवड पोलिसांची कारवाई

। पिंपरी-चिंचवड।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बांगलादेशी घुसखोरांवर पुन्हा एकदा कारवाई केली आहे. पाच घुसखोर बांगलादेशींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड, पासपोर्ट, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला मिळून आला आहे. भोसरी येथील शांतीनगरमध्ये शनिवारी (दि.२५) सायंकाळी सहाच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे.**



शामीम नुरोल राणा (२६, रा. जमलपूर, जि. ढाका), राज ऊर्फ सम्राट सधन अधिकारी (२७, रा. लक्ष्मीपूर, राजेर, जि. मदारीपूर), जलील नुरू शेख ऊर्फ जलील नुरमोहम्मद गोलदार (३८, रा. चर आबूपुर, हिजला, जि. बोरीसाल), वसीम अजिज उलहक मंडल ऊर्फ वसीम अजिज उलहक हिरा (२६), आझाद शमशुल शेख ऊर्फ मो. अबुल कलाम शमशुद्दीन फकीर (३२, दोघेही रा. फुलबरिया, जि. मयमेनसिंग), अशी अटक केलेल्या बांगलादेशी घुसखोरांची नावे आहेत. दरम्यान, आरोपींना पिंपरी येथील नेहरुनगर येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना बुधवारपर्यंत (दि.२९) पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यांच्यासह त्यांना बनावट कागदपत्रे बनवून देणाऱ्या इतर संशयितांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिस अंमलदार सुयोग लांडे यांनी याप्रकरणी रविवारी (दि.२६) भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी- चिंचवड शहरात भोसरी येथील शांतीनगरमध्ये काही बांगलादेशी घुसखोर ओळख लपवून वास्तव्य करत असल्याची माहिती पिंपरी- चिंचवड पोलिसांच्या दहशत विरोधी शाखेला मिळाली. त्यानुसार, दहशतवाद विरोधी शाखा आणि भोसरी पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये पाच संशयितांना अटक केली. त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला व पासपोर्ट मिळून आले.

त्यांनी या कागदपत्रांच्या आधारे भारतीय नागरिक असल्याचे भासवून भारतात वास्तव्य केले. त्यांनी कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्रांशिवाय किंवा भारतामध्ये राहण्यासाठी लागणाऱ्या वैध व्हिसाशिवाय भारत-बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश केला. भोसरी पोलिस तपास करत आहेत.



“ शांतीनगरमध्ये काही बांगलादेशी घुसखोर ओळख लपवून वास्तव्य करत आहेत. पिंपरी- चिंचवड पोलिसांच्या दहशत विरोधी शाखेच्या अधिकाऱ्यांनी ही धडक करावाई केली. त्याबद्दल त्यांचे मी आभार व्यक्त करतो. दहशतवाद विरोधी शाखा आणि भोसरी पोलिसांनी पाच संशयितांना अटक केली असली, तरी शहरातील काही भागांमध्ये अनेक ठिकाणी बनावट आधारकार्ड, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला व पासपोर्टच्या आधारे भारतीय नागरिक असल्याचे भासवून घुसखोर वास्तव्य करीत आहेत. शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने अशा घुसखोरांच्या वेळीच मुसक्या आवळाव्यात, अशी अपेक्षा आहे. “बांगलादेशी घुसखोर व पिंपरी-चिंचवडची सुरक्षा” या संवदेनशील मुद्यावर आगामी विधीमंडळ अधिवेशनात प्रभावीपणे भूमिका मांडणार आहे.

**– महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# ‘लव्ह ट्रँगल’... तरुणाला कारखाली चिराडले!

## टेल्को रोडवरील घटना : तरुणाला अटक; पिंपरी पोलिसांची कारवाई

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवडमध्ये प्रेम प्रकरणातून एका तरुणाने दुसऱ्या तरुणाला चार चाकी गाडीने उडवल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमध्ये निलेश शिंदे हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुशील भास्कर काळे या आरोपीला पिंपरी पोलिसांनी अटक केली आहे. जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मध्यरात्री एकच्या सुमारास टेल्को रोड यशवंत नगर या ठिकाणी घडलेली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुशील भास्कर काळे आणि जखमी निलेश शिंदे या दोघांचं एकाच युवतीवर प्रेम आहे. परंतु, प्रेयसी ही सुशील भास्कर काळे याच्यावर प्रेम करते तर निलेश शिंदे हा आधी त्या युवतीचा प्रियकर होता. निलेश शिंदे हा युवतीला त्रास देत असल्याचं युवतीचे म्हणणं आहे. मध्यरात्री निलेश शिंदे हा एक्स गर्लफ्रेंड (प्रेयसीला) दुचाकी घेऊन भेटायला आला, याची कल्पना त्या युवतीने आरोपी सुशील भास्कर काळे याला दिली होती. जेव्हा टेल्को रोड या ठिकाणी रस्त्यावर निलेश शिंदे आणि सुशील भास्कर याची प्रेयसी बोलत थांबले, तेव्हा सुशील भास्कर याने भरधाव वेगातील चार चाकी गाडी निलेश शिंदेच्या अंगावर घातली. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. तातडीने त्याला रुग्णालयात घेऊन जाण्यात आल.

याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी आरोपी सुशील भास्कर काळे याला अटक केली आहे. जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्या युवतीची पिंपरी पोलीस अधिक चौकशी करत आहेत. हा सर्व प्रकार लव्ह ट्रँगल मधून घडल्याचं समोर आलेले आहे.

### पिस्तुलाच्या धाकाने लुटणाऱ्या दोघांना बेड्या; हिंजवडी पोलिसांची कामगिरी

हिंजवडी : पिस्तुलाच्या धाकाने लुटणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. त्यांच्याकडून दोन पिस्तूल, सहा काडतुसे, दोन दुचाकी जप्त केल्या आहेत. तसेच, सोन्याची चेनदेखील हस्तगत करण्यात आली आहे. हिंजवडी पोलिसांनी ही कारवाई केली. अजय शंकर राठोड (२१, रा. पाषाण), जिशान जहीर खान (२३, रा. दापोडी, मूळ रा. उत्तर प्रदेश) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गावठी कट्टे घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, हिंजवडी पोलिसांनी माण-हिंजवडी आणि सूस पुलाखाली सापळा लावला. तेथे आरोपी अजय आणि जिशान यांना ताब्यात घेतले. अजय याच्या ताब्यातून ५१ हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल, दोन जिवंत काडतूस व एक दुचाकी मिळून आली. जिशान याच्याकडे ८७ हजार रुपये किमतीचा एक गावठी कट्टा, चार काडतुसे व दुचाकी मिळून आली. अजय आणि जिशान हे एकमेकांचे मित्र असून, त्यांनी दोन्ही दुचाकी बावधन व सूसू येथे चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. अजय व जिशान यांनी सूस पुलाजवळील डोंगरावर पाषाण येथे त्यांच्या इतर तीन साथीदारांसह मिळून गावठी पिस्तूलचा धाक दाखवून एका व्यक्तीचे अपहरण केले. त्या व्यक्तीच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाची सोनसाखळी जबरदस्तीने काढून घेतली असल्याचे तपासातून समोर आले. पोलिसांनी त्यांच्याकडून ३५ हजार रुपये किमतीची आठ ग्रॅम वजनाची सोनसाखळी हस्तगत केली. याबाबत चतुः श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# न्यायालयांचा धाक निवडणुकीतही गरजेचा!




**अनुच्छेद ३२९ नुसार, 'निवडणूक काळा'त आयोगाने घेतलेल्या निर्णयांमध्ये उच्च वा सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप न करण्याचा पायंडा आजवर पाळला गेला; पण बदलत्या परिस्थितीत तो बदलू शकेल का?**

घटनात्मक आणि स्वायत्त असलेल्या निवडणूक आयोगाच्या निर्णयांत हस्तक्षेप न करण्याची कायदेशीर परंपरा आजतागायत आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांतून वेळोवेळी ते अधोरेखित केले आहे. संविधानातील पंधराव्या भागात अनुच्छेद ३२४ ते ३२९ निवडणूक आयोगाचे अधिकार विशद करणारे आहेत. अनुच्छेद ३२९ अंतर्गत मतदारसंघ आखणीला आव्हान देता येत नाही, तसेच विधानसभा वा लोकसभा निवडणूकअंतर्गत तंट्याची दाद आधी आयोगाकडेच मागावी लागते. याहूनही गंभीर प्रकरणांची संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने न्यायालयांनी दखल घेतल्याचा इतिहास आहे. निवडणूक आयोगाला सर्वाधिक स्वातंत्र्य दिले गेल्याचे आजवरचे न्यायालयीन निकाल स्पष्ट करतात. सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद ३२ अथवा उच्च न्यायालयांनी अनुच्छेद २२६ अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नेहमीच नकार दिला आहे. निवडणूक निकालांना न्यायालयात आव्हान देण्याचा म्हणजे निवडणूक याचिकेचाच एकमेव कायदेशीर पर्याय लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार उपलब्ध आहे.



चंडीगड महापौर पदाच्या निवडणुकीतील गैरकारभाराची न्यायालयाने अनुच्छेद ३२ अंतर्गत दखल घेतल्याने तात्काळ न्याय होऊ शकला. पण दुसरीकडे २०१९ साली अरुणाचल प्रदेशातील करिखो क्री यांच्या निवडणूक निकालाच्या वैधतेवरील याचिकेचा अंतिम निकाल येण्यास पाच वर्षे लागली. या याचिकेने इंदिरा गांधींचे आसन डळमळीत केल्याचा इतिहास असला तरी, एकंदरीत निवडणूक याचिकेची प्रक्रिया बहुतांशी संथ आणि दीर्घकाळ चालणारी असते. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन न्यायपीठाने फॉर्म १७ सी बाबत हस्तक्षेप न करण्याचीच भूमिका कायम ठेवली. मग निवडणुकीच्या पश्चात आकडेवारीत तफावत आढळली, तर सर्वोच्च न्यायालय त्याची दखल घेईल? अथवा लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास सांगेल? निवडणूक याचिकांचा पर्याय निवडण्यास सांगितल्यास ती प्रकरणे व्यापक सांविधानिक कक्षेतून बाहेर होत मर्यादित कायदेशीर कक्षेत समाविष्ट होतील. अर्थात या जरतरच्या प्रश्नांची उत्तरे वेळ आल्यावर स्पष्ट होतीलच. पण न्यायालयाच्या संयमाची आधीची उदाहरणे पाहू.

एन. पी. पोन्नुस्वामी वि. निवडणूक अधिकारी (१९५२)

एन. पी. पोन्नुस्वामी विरुद्ध निवडणूक अधिकारी प्रकरणात याचिकाकर्ते पोन्नुस्वामी यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्याच्या निर्णयास मद्रास उच्च न्यायालयात अनुच्छेद २२६ अंतर्गत आव्हान दिले. त्यात हस्तक्षेप करण्यास नकार देताना उच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद ३२९ तरतुदीनुसार आयोगाकडेच दाद मागा, असे सुनावून याचिका फेटाळली. त्याविरोधात पोन्नुस्वामी यांनी अनुच्छेद १३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सरन्यायाधीश पतंजली शास्त्री, न्या. फझल अली, न्या. मेहेरचंद महाजन, न्या. बी. के. मुखर्जी आणि न्या. एन. चंद्रशेखर अय्यर यांच्या पाच सदस्यीय पीठाने २१ जानेवारी १९५२ रोजी उच्च न्यायालयाचा निकाल योग्य असल्याचे सांगत पोन्नुस्वामींचे आव्हान फेटाळले. अनुच्छेद ३२९ नुसार लोकसभा अथवा विधानसभेच्या निवडणुकीस कुठल्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. त्यासाठी १९५१ सालच्या लोकप्रतिनिधी कायद्यात नियुक्त लवादासमक्ष निवडणूक याचिका हाच एकमेव पर्याय असेल याकडे न्यायालयांनी लक्ष वेधले. याच खटल्यात 'निवडणूक' शब्दाचे विश्लेषण करताना न्यायालयाने संपूर्ण प्रक्रिया आणि त्याअंतर्गत विविध टप्पे हे निवडणुकीचाच भाग असल्याचे स्पष्ट केल्याने पोन्नुस्वामींची याचिका 'निवडणूक काळ' हा पायंडा पाडणारी ठरली. अनुच्छेद ३२९ अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत न्यायालयांनी हस्तक्षेप करू नये या तरतुदीचा राजकीय गैरफायदा घेतल्याचे उदाहरण म्हणजे रश्मी बर्वे प्रकरण. माहिती आयुक्त, जातपडताळणी समिती व समाजकल्याण विभाग या संस्थांनी आपल्या कायदेशीर कक्षेबाहेर जाऊन निर्णय घेतले. निवडणूक लढवण्यास इच्छुक उमेदवाराला त्याचा फटका बसून रश्मी बर्वे यांचा अर्ज बाद झाला. आचारसंहिता असूनही जातपडताळणी समितीची तत्परता दखल घेण्याजोगी होती. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे उल्लंघन करून जातपडताळणी समितीने बर्वे यांना २४ तासांत उत्तर देण्यास फर्मावले.

## संपादकीय »

### सुसंस्कृतांची झोपडपट्टी!

***आपली शहरे थोड्याफार फरकाने बकालच; पण ती निदान डोंबिवली वा पुण्याप्रमाणे सांस्कृतिक राजधानी, 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' वगैरे तोरा तरी मिरवत नाहीत...***

पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी तर डोंबिवली ही उपराजधानी. या विधानावर पार्लेकर नाक मुरडतील. पण पार्ल्यातील वाढत्या गुर्जर बांधवास हे सांस्कृतिक राजधानीचे बिरुद हरपल्यामुळे फारसे वाईट वाटणार नाही. तथापि पुणे वा डोंबिवली यांच्यापेक्षा पार्ले अधिक भाग्यवान. मुंबईच्या आच्छादनाखाली असल्यामुळे असेल, पण पार्ल्याचे डोंबिवली वा पुणे झाले नाही. पुणे आणि डोंबिवली यांची तुलना केल्यास डोंबिवली अधिक दुर्दैवी. तसेच डोंबिवली आतून आणि बाहेरून दोन्ही प्रकारे उन्मळत असून पुण्याबाबत हे उन्मळणे तूर्त तरी आतून (इम्प्लोड) होताना दिसते. पुणे सध्या कोणा अगरवाल कुलोत्पन्नाच्या मस्तवाल उद्योगांमुळे सात्त्विक संतापलेले आहे तर डोंबिवली कोणा मेहता नामक उद्योगीच्या स्फोटांनी हादरलेल्या अवस्थेत आहे. पुण्यातील अपघातात बळी दोनच गेले; त्यानंतर त्या शहराच्या अनेक जखमांवरील खपल्या निघाल्या.

परंपरेप्रमाणे दहावीला अगदी भरघोस मार्क मिळवून मुले पास झाली आहेत. परीक्षेला बसलेल्या साडेपंधरा लाखांपैकी साडेपाच लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रावीण्यासह प्रथम श्रेणी, अर्थात ७५ टक्क्यांहून अधिक मार्क आहेत. चांगलेच आहे. निकाल लावणारे राज्य मंडळ खूश, शाळा आनंदी, मुले जल्लोषात आणि पालक स्वप्नात!

# 'मार्क' मिळाले; 'गुणां'चे काय?

उत्तम. आता थोडे वास्तव. त्यासाठी, 'मार्क तर मिळाले, पण 'गुण' किती प्राप्त झाले,' हा एक साधा प्रश्न. दहावीचे हे मार्क बारावीत किती होतात, पदवीला किती होतात आणि नंतर व्यवसाय-रोजगार करताना किती उपयोगी येतात, हा खरा प्रश्न. ज्या विद्यार्थ्याला दहावीत अगदी ९० टक्के किंवा त्याहून अधिक मार्क असतात, त्यांना नववीत किती मार्क होते, असे विचारले, तर अनेकजण उत्तरच देत नाहीत. कारण बहुतांशांचे ते १०-१५ टक्क्यांनी कमी असतात. अकरावीत गेल्यावर या ९० टक्क्यांचे किती होतात? तेही बहुतांशांचे १०-१५ टक्क्यांनी कमी! पण बारावीत पुन्हा भरघोस. नववी व अकरावी आणि दहावी व बारावी या इयत्तांमधील मार्कांत इतका फरक का? नववी-अकरावीच्या परीक्षा शाळा-कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर होतात, तर दहावी आणि बारावीच्या परीक्षा राज्य शिक्षण मंडळ घेते. विद्यार्थी तोच असेल, तर लागोपाठच्या दोन



परीक्षांत लागणारा कस इतका कसा वेगवेगळा असू शकतो? का प्रत्येक विषयाचे अंतर्गत गुण शाळांच्या 'हाता'त असल्याने काही फरक पडतो? की मंडळावर निकाल उत्तम लावण्याचा दबाव असल्याने सढळ हस्ते मार्क वाटले जातात?

आणखी एक चर्चेचा मुद्दा म्हणजे कला-क्रीडा गुण. नृत्य, नाट्य, चित्रकला, लोककला शिकणाऱ्या आणि त्यातील काही ठरावीक प्रमाणपत्रे असणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावीत वाढीव गुण मिळतात. एनसीसी, स्काउट, गाइड, तसेच एखाद्या क्रीडा प्रकारात राज्य-राष्ट्रीय स्तरावर सहभाग आदींसाठीही ही सवलत आहे. यासाठी त्या कला-क्रीडा प्रकाराची वेगळी परीक्षा होत नाही, तर प्रमाणपत्रावर विसंबून हे मार्क दिले जातात. यंदा दहावीला असे वाढीव दोन ते तीन टक्के (१० ते १५ मार्क) मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या आहे तब्बल पावणेदोन लाख! आणि, या वाढीव गुणांसाठी ज्यांची प्रमाणपत्रे ग्राह्य धरली गेली, अशा संस्थांची संख्या आहे ७६! या सर्व संस्था खरेच प्रावीण्य बघून प्रमाणपत्रे देतात का, हा स्वतंत्र शोधाचा विषय. तरीही असे गृहीत धरू, की कला-क्रीडा प्रकारांत काही मुले निश्चित प्रवीण असतात, पण त्यांचे कला किंवा क्रीडाप्रावीण्य दहावीला मार्क फुगवण्यामुळे झळाळून निघेल, हा कोणता तर्क? मुळात मुद्दा असा आहे, की नियमित अभ्यासाचे विषय काय, कलाविषय काय किंवा क्रीडाप्रावीण्य काय, व्यक्तिमत्त्व समृद्ध होण्यासाठी या सगळ्यांतीलच 'गुण' विकसित करणे हाच मुळात शालेय शिक्षणाचा उद्देश नको का? आपण मात्र 'मार्क्स संस्कृती' जोपासून शालेय स्तरावर 'वर्ग'व्यवस्था चोख ठेवली आहे.

## || अभंगवाणी ||



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गृहमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा!

## » नाना पटोले : गुन्हेगारांना वाचविण्याचा प्रयत्न

।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

'राज्यात सध्या दुष्काळाचा प्रश्न गंभीर असताना दारू आणि अमली पदार्थांचे सेवन करून सर्वसामान्य लोकांना गाडीखाली चिरडण्याचे प्रकार वाढत आहेत. यातील गर्भश्रीमंत आरोपींना तातडीने जामीन कसा मिळेल यासाठी सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून प्रयत्न झाले. पुण्याच्या प्रकरणात असाच राजकीय हस्तक्षेप झाल्याचे दिसून आल्याने राज्याच्या यंत्रणेवर विश्वास नाही. पुण्याच्या अपघात प्रकरणाची चौकशी 'सीबीआय'मार्फत करावी, तसेच गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या गृहमंत्र्यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



### » पुण्याच्या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप,
### » राज्याच्या यंत्रणेवर विश्वास नाही

मुंबई :टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही मागणी केली. "पुण्यात गर्भश्रीमंत व्यक्तीच्या अल्पवयीन मुलाने मोटारीखाली दोघांना चिरडले. त्याच्याबरोबर एका आमदाराचा मुलगाही होता.

तो कोण हे समजले पाहिजे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या वकिलीचा वापर आरोपींना वाचवण्यासाठी केला. गुजरातमधून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ महाराष्ट्रात आणून तरुण पिढीला बरबाद करण्याचे पाप भाजपने केले आहे. मुख्यमंत्र्यांनी यावर खुलासा करावा. फडणवीस यांची भूमिका संशयास्पद वाटते, त्यामुळे त्यांचा राजीनामा घ्यावा."

"गृहमंत्र्यांच्या नागपूर शहरातही दोन मुलींनी दोन युवकांना गाडीखाली चिरडून मारले. तरीही त्यांना दहा तासांत जामीन मिळाला. जळगावातही एकाला गाडीखाली चिरडण्यात आले व त्यातही आरोपीला वाचविण्याचे प्रयत्न झाला.

पुण्याच्या ससून रुग्णालयामधील डॉ. तावरे यांनी आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलले. डॉ. तावरे यांना अधीक्षक पदासाठी नियुक्त करावे यासाठी एक मंत्री व आमदार यांनी शिफारस केली होती. तो मंत्री व आमदार कोण हे जनतेला समजले पाहिजे," असे पटोले म्हणाले.

### अधिकारी, लोकप्रतिनिधींनी इमान विकले

"पुण्यात घडलेल्या अग्रवाल प्रकरणात रोजच नव्या बाबी समोर येत आहेत. एका बड्या बापाच्या मुलाला वाचवायला कित्येक अधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी त्यांचे इमान त्या रात्री विकले," असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. डॉ. अजय तावरे यांना ससूनचे वैद्यकीय अधीक्षकपद देण्याची शिफारस करणारे व त्यावर वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचा शेरा असलेले आमदार सुनील टिंगरे यांचे पत्र आव्हाड यांनी पोस्ट केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, आरोपीचे रक्ताचे नमुने डॉ. अजय तावरे आणि श्रीहरी हरणोर यांनी चक्क कचऱ्यात फेकले. इतकेच नाही तर याचा अहवाल द्यायला ४-५ दिवस लावले. एरवी दोन तासांत मिळणाऱ्या या अहवालाला इतका वेळ का लागत असावा, असा सवाल आव्हाड यांनी केला.

---

# नाशिकः एकसाथ ८ कर्मचारी निलंबित

## » नाशिक जिल्हा परिषदेच्या सीईओंचा खळबळजनक आदेश

।नाशिक।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

जिल्हा परिषदेतील विविध विभागांतील आठ कर्मचाऱ्यांचे निलंबनाचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. कारवाई करण्यात आलेल्यांमध्ये ग्रामपंचायत विभागातील दोन, बांधकाम विभागातील दोन, शिक्षण विभागातील तीन तर आरोग्य विभागातील एका कर्मचाऱ्याचा समावेश आहे. विविध कारणांमुळे या कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश मित्तल यांनी दिले आहेत.




### काय प्रकरण?

काही दिवसांपूर्वी दिंडोरी तालुक्यात झालेल्या शिक्षण विभागाच्या सहविचार सभेत दोन शिक्षकांची हाणामारी झाली होती. याची चित्रफीत समाजमाध्यमांवर व्हायरल झाली. त्यामुळे या दोन्हीही शिक्षकांना निलंबनाचे आदेश देण्यात आले आहेत. याचबरोबर जिल्हा परिषद शाळा वाडीवऱ्हे (ता. इगतपुरी) येथेही एप्रिल महिन्यात मित्तल यांनी भेट दिली परंतु, शाळेत कुणीही हजर नव्हते. पूर्वसूचना देऊनही शाळेत शिक्षक उपस्थित नसल्याने शाळेच्या मुख्याध्यापकांचे निलंबन करण्यात आले आहे. तसेच वडनेर भैरव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाविषयी वारंवार तक्रारी दाखल येत होत्या.

याबाबत मित्तल यांनी चौकशीसाठी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे पथक पाठविले परंतु, वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याचे आढळले.

रुग्णालयात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झालेले रुग्ण असताना त्यांची वैद्यकीय तपासणी झालेली नव्हती. तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना न कळवता गैरहजर असल्याचे आढळल्याने चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे. ग्रामपंचायत विभागातील पंचायत समिती चांदवड तसेच वळवाडी (ता. मालेगाव) येथील ग्रामसेवकांच्या

सुरगाणा पंचायत समिती येथील बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना ४० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. त्यांचेही निलंबन करण्यात आले आहे. तसेच बागलाण पंचायत समिती येथील उपअभियंता यांच्याबाबतदेखील काही आर्थिक कारणांवरून तक्रार करण्यात आली होती. यासंदर्भात संबंधित उपअभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

# धर्माच्या नावाखाली लोकांची दिशाभूल!

## प्रियंका गांधीवढेरा यांची मोदींवर टीका

।उना (हिमाचल प्रदेश) ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'लोकविरोधी' ठरवत काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी वढेरा यांनी मोदी सत्तेत राहण्यासाठी धर्माच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करत आहेत, अशी टीका केली. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशाला गरजेच्या वेळी आपले दागिने दिले होते आणि मोदी म्हणतात की काँग्रेसवाले तुमचे मंगळसूत्र चोरतील. अशी भाषा देशाच्या पंतप्रधानांना शोभत नसल्याचे प्रियंका म्हणाल्या.**



हिमाचलच्या उना जिल्ह्यातील गाग्रेट येथे एका निवडणूक सभेला संबोधित करताना त्या म्हणाले की, मोदींनी स्वत:ला देव समजण्यास सुरुवात केली आहे आणि त्यांना वाटते की त्यांना धर्माच्या नावावर मते मिळतील, परंतु लोकांची दिशाभूल होणार नाही. हमीरपूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार सतपाल रायजादा आणि गाग्रेट विधानसभा पोटनिवडणुकीत पक्षाचे उमेदवार राकेश कालिया यांच्यासाठी प्रचार करताना प्रियंका म्हणाल्या की, भाजप 'सर्वसाधारणपणे लोकविरोधी आणि विशेषत: युवकविरोधी आहे'. मोदी सरकारने अमेरिकन सफरचंदावरील आयात शुल्क कमी केल्याचेही त्या म्हणाले. मोदी सरकारवर हल्ला चढवत प्रियंका गांधी म्हणाल्या की भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारकडे हिमाचल प्रदेशातील आपत्तीग्रस्त लोकांसाठी पैसे नाहीत, परंतु त्यांनी श्रीमंत उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले,' असे त्यांनी जनतेला सांगितले.

### 'मत जिहाद'साठी ओबीसींचे हक्क हिसकावले



बारासात (पश्चिम बंगाल) : पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारवर तुष्टीकरणाचे राजकारण केल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केला. 'मत जिहाद'ला प्रोत्साहन देण्यासाठी इतर मागासवर्गीय (ओबीसी) तरुणांचे हक्क हिरावून घेतल्याचा आरोप बारासात येथे एका निवडणूक रॅलीला संबोधित करताना पंतप्रधानांनी केला.
मोदींनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे नाव न घेता कोलकाता उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवर प्रश्न उपस्थित केल्याबद्दल टीका केली. ते म्हणाले, "तृणमूलने बंगालमधील ओबीसींशी केलेला विश्वासघात न्यायालयाने उघड केला आहे. ७७ मुस्लीम जातींना ओबीसी म्हणून घोषित करणे बेकायदा आणि घटनाबाह्य असल्याचे कोलकाता उच्च न्यायालयाने म्हटले आहे. म्हणजेच मत जिहादींना मदत करण्यासाठी तृणमूलने लाखो ओबीसी तरुणांचे हक्क रातोरात लुटले. तृणमूलने राज्यातील ओबीसी समाजाचा विश्वासघात केल्याचे ते म्हणाले. पंतप्रधान म्हणाले, "येथील न्यायाधीशांच्या हेतूवर आणि आपल्या न्यायव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मला तृणमूलच्या लोकांना विचारायचे आहे की, ते आता न्यायाधीशांच्या मागेही त्यांचे गुंड सोडतील का? तृणमूल बंगालमधील न्यायव्यवस्थेचा कसा गळा घोटत आहे याकडे संपूर्ण देश पाहत आहे."

# ईशान्य दिल्लीतील निकालाबाबत उत्सुकता

## मतटक्का वाढीचा फायदा कन्हैय्या कुमार की मनोज तिवारींना

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी सहाव्या टप्प्यातील मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर केली असून दिल्लीमध्ये काँग्रेसचे उमेदवार कन्हैय्या कुमार यांच्या उत्तर-पूर्व मतदारसंघामध्ये उच्चांकी ६२.८९ टक्के मतदान झाले आहे. अन्य सहा मतदारसंघांमध्ये मतटक्क्याने साठीदेखील पार केलेली नाही. उत्तर-पूर्वमध्ये झालेल्या भरघोस मतदानामुळे या जागेसाठी कमालीची चुरस निर्माण झाली आहे.**





उत्तर-पूर्व मतदारसंघामधील सीलमनगर, मुस्तफाबाद हे मुस्लीमबहुल विधानसभा मतदारसंघ आहेत तर, सीमापुरी, गोकुलपूर हे अनुसूचित जातींसाठी राखीव विधानसभा मतदारसंघ आहेत. या भागांतील मुस्लीम व दलित मतदारांनी काँग्रेस व 'आप'च्या 'इंडिया' आघाडीला मोठ्या प्रमाणावर मतदान केल्याचे मानले जात आहे. 'इंडिया' आघाडीसाठी कार्यरत असलेल्या नागरी संघटनांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे दिल्लीत इतर मतदारसंघांपेक्षा उत्तर-पूर्वमध्ये मतटक्क्याने उच्चांक गाठल्याचे पाहायला मिळाले.

२०१९ मध्ये उत्तर-पूर्व मतदारसंघामध्ये ६३.८१ टक्के मतदान झाले होते. पण, पाच वर्षांपूर्वी दिल्लीतील एकूण चार मतदारसंघांमध्ये ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले होते. यावेळी फक्त उत्तर-पूर्व मतदारसंघामध्येच ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले आहे. गेल्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावाने भाजपला मते दिली गेली होती. चांदनी चौक, पूर्व दिल्ली व पश्चिम दिल्ली या मतदारसंघांमध्येही मतटक्क्यांनी साठीपार केली होती. यावेळी इथे मतटक्का पन्नाशीत राहिला आहे.

दिल्लीमध्ये गेल्या शनिवारी झालेल्या मतदानामध्ये चांदनी चौक मतदारसंघात ५८.६० टक्के, पूर्व दिल्ली ५९.५१ टक्के, उत्तर-पश्चिम दिल्लीमध्ये ५७.८५ टक्के, दक्षिण दिल्लीमध्ये ५६.४५ टक्के व पश्चिम दिल्लीमध्ये ५८.७९ टक्के मतदान झाले आहे. या तुलनेत उत्तर-पूर्व मतदारसंघामध्ये जास्त मतदान झाले असून त्याचा फायदा भाजपचे विद्यमान खासदार मनोज तिवारी की, कन्हैय्या कुमार यांना मिळणार याकडे लक्ष वेधले गेले आहे.

### सहाव्या टप्प्यात 63.37 टक्के मतदान

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात ६३.३७ टक्के मतदान झाले असून ११.१३ कोटी पात्र मतदारांपैकी ७.०५ कोटी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे, असे भारतीय निवडणूक आयोगाने मंगळवारी म्हटले आहे. २५ मे रोजी सहाव्या टप्प्यात आठ राज्यांतील ५८ जागांसाठी मतदान झाले. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या सहा टप्प्यातील ८७.५४ कोटी मतदारांपैकी तब्बल ५७.७७ कोटी मतदारांनी मतदान केंद्रांवर मतदान केले. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत, सहाव्या टप्प्यातील मतदान (सात राज्यांतील ५९ जागांसाठी मतदान झाले होते) ६४.४ टक्के होते. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, २० मे रोजी झालेल्या मतदानाच्या पाचव्या टप्प्यात ६२.२ टक्के मतदान झाले. चौथ्या टप्प्यातील मतदान ६९.१६ टक्के इतके होते, जे २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील संबंधित टप्प्यापेक्षा ३.६५ टक्के जास्त आहे. तिसऱ्या टप्प्यात ६५.६८ टक्के मतदान झाले आहे. २०१९ मधील निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात ६८.४ टक्के मतदान झाले होते. यंदाच्या निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात ६६.७१ टक्के मतदान झाले. तर पहिल्या टप्प्यात ६६.१४ टक्के मतदान झाले आहे.

# अक्षय कुमारला स्लिप डिस्कचा त्रास



खिलाडी' म्हणून प्रचलित असलेल्या सुपरस्टार अक्षय कुमारचा आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अक्षय व टायगर यांची जोडी सध्या अनेक मुलाखतींमध्ये पाहायला मिळतेय. त्यानिमित्तानं अक्षयनं एका चित्रपटातील आठवण शेअर केली आहे; ज्यात एका शूटिंगदरम्यान त्याला मोठी दुखापत झाली होती. १९९६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपटाच्या फाईट सीक्वेन्सच्या शूटिंगदरम्यान अक्षयला स्लिप डिस्कचा त्रास झाला होता. रणवीर इलाहाबादियाच्या यूट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अक्षय कुमारनं सांगितलं की, त्याला 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपट नेहमी लक्षात राहतो आणि यामागचं कारण हे नाही की तो चित्रपट सुपरहिट ठरला होता. तर याचं कारण हे आहे की, या चित्रपटामुळे अक्षयच्या पाठीला गंभीर दुखापत झाली होती.मुलाखतीत अक्षय म्हणाला, "मला आणि माझ्या पाठीला हा चित्रपट कायमचा लक्षात राहिला आहे. मी अंडरटेकर ही भूमिका बजावणाऱ्या एका रेसलरला उचललं होतं आणि त्याचं वजन ४२५ पाउंड म्हणजेच १९२ किलो होतं. मी तेव्हा वेडा झालो होतो. मी ठरवलेलं की, याला मी उचलणार."अक्षयनं तो स्टंट केला आणि सीन शूट झाला. तीन दिवसांनंतर त्याला जाणवलं की, पाठीत कसला तरी त्रास होतोय. तेव्हा त्याला 'स्लिप डिस्क'चा त्रास झाला असल्याचं कळलं.२०२१ रोजी 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपटाला २५ वर्षं पूर्ण झाली होती, तेव्हा अक्षयनं माहिती शेअर करून सांगितलं होतं की, या चित्रपटात स्टार रेसलर अंडरटेकर नसून ब्रायन लीनं त्याची भूमिका साकारली आहे.दरम्यान, अक्षय कुमारच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'बडे मियाँ छोटे मियाँ' या आगामी चित्रपटात अक्षय टायगर श्रॉफबरोबर झळकणार आहे. मानुषी छिल्लर, अलाया फर्निचरवाला, पृथ्वीराज सुकुमारन, रोनित रॉय यांच्याही महत्त्वाच्या भूमिका या चित्रपटात आहेत. ईदच्या मुहूर्तावर १० एप्रिलला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# अवनीत कौरने केला साखरपुडा?

अवनीत कौरची ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होतेय. अभिनेत्री अवनीत कौरने वयाच्या नवव्या वर्षापासूनच तिच्या करिअरची सुरुवात केली. २०१०मध्ये 'डान्स इंडिया डान्स लिटिल मास्टर्स'च्या रिॲलिटी शोमध्ये तिने स्पर्धक म्हणून सहभाग घेतला होता. डान्सर अवनीतने दोन वर्षांनंतर अभिनय क्षेत्रासाठीची वाटचाल सुरू केली. २०१२ रोजी प्रसारित झालेल्या 'मेरी माँ' या मालिकेमधून तिने अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं.

मग अनेक मालिका, चित्रपट, वेब सीरिज तसेच म्युझिक व्हिडीओ करत तिने प्रेक्षकांचं मन जिंकलं. अभिनेत्रीने नुकतीचं कान्स फिल्म फेस्टिवललादेखील हजेरी लावली होती. अशातच आता अवघ्या २२ वर्षांच्या अवनीत कौरने साखरपुडा केला की काय? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

अवनीत सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. अभिनय क्षेत्राबरोबरच वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टीही ती चाहत्यांबरोबर शेअर करत असते. आता अवनीतने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. या फाटोमध्ये अवनीतने गुलाबी रंगाचा डिझायनर ड्रेस परिधान केलाय. मिनिमल मेकअप आणि तिच्या मॅचिंग नेल आर्टने तिने हा लूक पूर्ण केलाय. पण अवनीतच्या अंगठीने चाहत्यांच लक्ष वेधून घेतलंय. अभिनेत्रीने शेअर केलेल्या दोन्ही फोटोत अवनीत तिची अंगठी दाखवतेय यामुळेच अवनीतचा साखरपुडा झालाय की काय या चर्चांना उधाण आलंय.

अवनीतचा हा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. अभिनेत्रीच्या व्हायरल झालेल्या फोटोंवर चाहत्यांनी भरभरून कमेंट्सदेखील केल्या आहेत. एका चाहत्याने कमेंट करत विचारलं, "तिने साखरपुडा केलाय का?" तर दुसऱ्याने लिहिलं, "मला वाटतंय की तिने साखरपुडा केला असावा." तर अनेकांनी तिच्या होणारा पती कोण असेल याचे तर्कवितर्क लावायला सुरुवात केलीय.

"चांगल्या गोष्टींना वेळ लागतो. मी या युनियनबद्दल आणि पुढे काय होणार आहे हे जगाला सांगण्याची प्रतीक्षा करू शकत नाही" असं कॅप्शन अवनीतने या फोटोला दिलं आहे.

दरम्यान, अवनीत कौर नक्की कोणती गुड न्यूज देणआर आहे हे चाहत्यांना लवकरच कळेल. 'लव्ह इन व्हिएतनाम' या चित्रपटात अवनीत प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये या चित्रपटाच्या फर्स्ट लूकचे नुकताच



# माझ्या आयुष्यात एकच दिशा

टायगर श्रॉफ 'बडे मियाँ छोटे मियाँ' या त्याचा आगामी चित्रपटाच्या तयारीत आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. टायगर आणि अक्षयने या चित्रपटाचं प्रमोशन वेगवेगळ्या शहरांत जाऊन अनोख्या पद्धतीनं केलंय. टायगरला त्याचं वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवायला आवडतं. अनेकदा टायगर आणि दिशाच्या रिलेशनबद्दल अफवा पसरल्या आहेत. परंतु, या विषयावर टायगरनं नेहमीच बोलायचं टाळलं आहे. एका मुलाखतीत त्यानं दिशाचा उल्लेख केला आहे.नुकत्याच 'टाइम्स नाऊ'ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा टायगरला विचारण्यात आलं की, तू सिंगल आहेस का? तुझं आयुष्य कोणत्या दिशेला जातंय? त्यावर टायगरनं मजेशीर उत्तर दिलं. अभिनेता म्हणाला, "माझ्या आयुष्यात एकच दिशा आहे. हो आणि ते आहे माझं काम."दिशाबद्दलचा शब्दांचा हा खेळ 'बडे मियाँ छोटे मियाँ'च्या ट्रेलर लॉंचपासून सुरू झाला. जेव्हा अक्षय कुमारला विचारण्यात आलं होतं की, तो टायगरला काय सल्ला देऊ इच्छितो? तेव्हा अक्षय म्हणाला होता, "मी टायगरला एवढंच सांगेन की एकाच दिशेवर लक्ष केंद्रित कर." अक्षयच्या या वक्तव्याने सर्वत्र हशा पिकवला. टायगर श्रॉफ आणि 'दिशा पाटनी यांनी 'बेफिकरा', 'बाघी-२' अशा चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. तेव्हापासून ते एकमेकांना डेट करीत असलेल्याच्या अफवा सुरू झाल्या. २०२३ मध्ये त्यांचं ब्रेकअप झालाय अशा चर्चांनाही उधाण आलं होतं. परंतु, या दोन्ही गोष्टींवर टायगर किंवा दिशानं अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही.

# शहनाज गिलने घेतलं सिद्धिविनायकाचं दर्शन

बॉलीवूड अभिनेत्री शहनाज गिल 'बिग बॉस-१३'मुळे चर्चेत आली. रिॲलिटी शोजनंतर 'किसी का भाई किसी की जान', 'थँक्यू फॉर कमिंग' अशा अनेक चित्रपटांमध्ये शहनाज झळकली शहनाजने आपल्या करिअरची सुरुवात म्युझिक व्हिडीओने केली. शहनाजने आतापर्यंत अनेक म्युझिक व्हिडीओजमध्ये काम केलं आहे. आज (८ एप्रिल रोजी) शहनाजचा नवाकोरा म्युझिक व्हिडीओ 'धुप लगदी' प्रदर्शित झाला आहे. या म्युझिक व्हिडीओची खासियत अशी की, 'धुप लगदी' हे गाणं स्वत: शहनाजने गायलं आहे.

# गरोदर दीपिका पादुकोणच्या पिवळ्या ड्रेसचा झाला लिलाव

अभिनेत्री दीपिका पादुकोण लवकरच आई होणार आहे. गरोदर दीपिका नुकतीच एका कार्यक्रमासाठी पिवळ्या रंगाचा सुंदर ड्रेस घालून गेली होती. या ड्रेसची विक्री करण्यात आली आहे. दीपिकाचा हा ड्रेस हजारो रुपयांना विकला गेला आहे, अभिनेत्रीने यासंदर्भात तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर पोस्ट केली आहे. नुकताच दीपिका पादुकोणने आउटिंगसाठी घातलेला पिवळा लाँग गाऊन ड्रेस तुम्हाला आठवत असेल. दीपिकाने या ड्रेसमध्ये खूप सुंदर फोटोशूट केलं होतं. तिने हा ड्रेस घालून एका कार्यक्रमाला हजेरी लावली होती. तिचा हा ड्रेस गौरी आणि नैनिका या डिझायनर्सनी डिझाइन केला होता. हा ड्रेस लिलावासाठी ठेवण्यात आला होता. हा ड्रेस विकल्यानंतर आलेले पैसे चांगल्या कामासाठी दान करण्यात करण्यात आले आहेत. दीपिका पादुकोणचा पिवळा ड्रेस ३४ हजार रुपयांना विकला गेला. ही रक्कम अभिनेत्रीच्या लिव्ह लव्ह लाफ फाऊंडेशनला मदतीसाठी देण्यात आली आहे. दीपिकाने या ड्रेसमधील तिचा एक छानसा व्हिडीओ शेअर केला होता, पण या ड्रेसची किंमत व्हिडीओत देण्यात आली नव्हती. आता तिने इन्स्टाग्राम स्टोरीवर या ड्रेसमधील एक फोटो शेअर केला आहे, ज्यावर 'सोल्ड आउट' असं लिहिलं आहे.

दीपिका पदुकोण त्यापूर्वी मतदानासाठी घराबाहेर पडल्यावर पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली होती. २० मे रोजी मुंबईत लोकसभा निवडणुकांसाठी मतदाना पार पडलं. त्यादिवशी रणवीर व दीपिका दोघे कारने मतदान केंद्रावर पोहोचले होते. त्यांचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. रणवीर व दीपिका पांढरे शर्ट व डेनिम पँट अशा लूकमध्ये मतदानासाठी आले होते.



# बाबरच्या डोक्यात हवा शिरली!

## इंग्लंडच्या चाहत्याशी केलं गैरवर्तन

कार्डिफ । वृत्तसंस्था

**काही दिवसांतच टी -२० वर्ल्ड कपची सुरवात होणार आहे. यासाठी सगळ्याच संघानी चांगलीच कंबर कसायला सुरवात केली आहे. असे असताना पाकिस्तानच्या कर्णधारचा हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला असून याची चर्चा सर्वत्र चालू आहे. तर हा व्हिडिओ पाहून अनेक चाहते संतापले. बाबारचा स्टारडम त्याच्या डोक्यावर चढले असल्याचेही बोलले जात आहे.**



चार सामन्यांची टी-२० मालिका खेळण्यासाठी पाकिस्तानी क्रिकेट संघ इंग्लंडमध्ये दाखल झाला. टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तानी संघाची ही शेवटची मालिका आहे. दोन्ही संघांमधील मालिकेतील पहिला सामना रद्द झाला. तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. अशी परिस्थिती असताना बाबर आझमच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानी संघ करो या मरो स्थितीत इंग्लंडविरूद्ध तिसरा सामना खेळणार आहे. तर ही मालिका जिंकून टी-२० विश्वचषकासाठी मैदानात उतरण्याचा प्रयत्न करेल.

टी-२० वर्ल्ड कपसाठी रविवारपासून सराव सामन्याची सुरूवात झाली आहे. संघ टी-२० साठी रवाना झाले आहेत. तर इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतील तिसऱ्या सामन्यासाठी पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम कार्डिफला पोहोचला. बाबर येथील एका चौकात कोणाची तरी वाट पाहत असतानाच चाहत्यांनी त्याला ओळखले. आणि त्याच्या भोवती चाहत्यांनी गर्दी केली. त्यामुळे पाकिस्तानी कर्णधार चिडला आणि त्याने चाहत्यांशी गैरवर्तन केले. यावेळी त्याच्या अंगरक्षकाने चाहत्यांना धक्का देत मागे ढकलले.पाकिस्तानी संघाच्या कर्णधाराचा बाबर आझमचा हा व्हिडिओ सध्या

### डोक्यावर नका बसू", चाहत्यांवर संतापला

बाबर आझमचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये बाबर रस्त्यावर काही चाहत्यांना ओरडताना दिसत आहे. दोन मिनिट द्याल? डोक्यावर नका बसू... असं म्हणत त्याने चाहत्यांना मागे केलं आणि त्यानंतर तो एका व्यक्तिशी चर्चा करताना दिसला. पण तरीही चाहते ऐकेनात शेवटी त्याने सिक्युरिटीला सर्वांना मागे करण्यास सांगितले, बाबरच्या या वागण्यावरून त्याच्यावर बरीच टीका होत असून त्याच्या डोक्यात स्टारडम गेल्याचे बोलले जात आहे. खरंतर बाबर इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यासाठी कार्डिफला पोहोचला होता. बाबर येथील एके ठिकाणी थांबला होता, तेव्हा चाहत्यांनी त्याला ओळखले. काही वेळातच चाहत्यांची गर्दी तिथे जमली. लोकांचा जमाव पाहून पाकिस्तानी कर्णधार संतापला आणि त्याने चाहत्यांशी गैरवर्तन केले. यादरम्यान त्याच्या अंगरक्षकाने चाहत्यांना धक्काबुक्की करून मागे ढकलले. बाबर आझमच्या या कृतीवर चाहत्यांमध्ये निराशा पसरली आहे. मात्र, काही चाहत्यांनी बाबर आझमचा बचावही केला आहे. क्रिकेटर असण्यासोबतच बाबरचे स्वतःचे वैयक्तिक आयुष्य देखील आहे. हेही चाहत्यांनी लक्षात ठेवावे, असे सोशल मीडियावर काही चाहत्यांचे म्हणणे आहे. पण पुढे व्हीडिओमध्ये बाबरचे बोलून झाल्यानंतर त्याने चाहत्यांसोबत फोटोही काढल्याचा व्हीडिओ समोर आला आहे.

सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. तर तो या व्हिडिओमध्ये गर्दी केलेल्या चाहत्यांना शिवीगाळ करताना दिसत आहे. बाबरच्या या वागणुकीमुळे त्याच्यावर जोरदार टीका होत आहे. त्याच्या डोक्यावर स्टारडम चढल्याचे चाहत्यांचे म्हणणे आहे. बाबरचा व्हिडिओ हा काही वेळ सोशल मीडियावर दिसत होता. पण त्यानंतर त्याचे हे व्हिडिओ डिलीट करण्यात आले. त्यामुळे बाबरचे याबाबतचे कोणतेही व्हिडिओ सध्याच्या घडीला सोशल मीडियावर दिसत नसल्याचे समोर आले आहे. पण बाबर चाहत्यांशी असा वागू शकतो, यावर त्याच्या चाहत्यांचा विश्वास बसत नाही.

# मिचेल स्टार्क आयपीएलमधून निवृत्त होणार का

## ट्रॉफी जिंकल्यावर सांगितली मन की बात

।चेन्नई । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केकेआरच्या विजयात मिचेल स्टार्कचा मोठा वाटा होता. मिचेल हा फायनलमध्ये सामनावीर ठरला होता. पण आता आयपीएल जिंकल्यावर तो निवृत्ती पत्करणार का, याची चर्चा सुरु झाली होती. पण याबाबत आता मिचेलने एक खास गोष्ट सांगितली आहे.**




आयपीएलच्या १७ व्या मोसमात सुरूवातीस काही खेळाडूंच्या कामगिरीवर जोरदार टिका करण्यात आली होती. तसेच लिलावादरम्यान त्यांचासाठी लावलेली बोली योग्य आहे का ? असा प्रश्न देखील निर्माण झाला होता. परदेशी खेळाडूंना जितके मानधन दिले जाते त्याप्रकारची त्यांची कामगिरी नसल्याचेही आरोप काही खेळाडूंवर झाले. या खेळाडूंपैकी एक म्हणजे कोलकाताकडून खेळणारा मिचल स्टार्कने आहे. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल फ्रँचायझी क्रिकेट खेळण्यासाठी कोणत्याही एका फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याचे संकेत दिले आहेत.

या ऑस्ट्रेलियन खेळाडूसाठी कोलकाताने तब्बल २४.७५ कोटींची बोली लावून संघात सामील केले. मिचेल राष्ट्रीय संघाशी असलेल्या बांधिलकीमुळे जवळपास दहा वर्षांपासून आयपीएलपासून दूर झाला होता. परंतु या वर्षी तो पुन्हा आयपीएलच्या हंगामात दिसला.

### पुढच्या वर्षी परत येईन

स्टार्कला आशा आहे की तो पुढील वर्षी केकेआरकडून ही खेळेल. यावर तो म्हणाला, “मला भविष्यातील कार्यक्रमाबद्दल माहिती नाही. पण मी या स्पर्धेचा पुरेपूर आनंद घेतला आहे, आणि आशा आहे की मी पुढच्या वर्षी परत येईन. मी पुन्हा एकदा केकेआरच्या जांभळ्या आणि सोन्याच्या जर्सीमध्ये दिसू शकतो.”

सुरूवातीच्या काही सामन्यात स्टार्कला आपली चमक दाखवता आली नाही. त्यामुळे त्याच्यावर जोरदार टिका झाली. पण जस जसा पर्वाचा शेवट जवळ आला तस तसा त्याने स्वतःला सिद्ध केले. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या अंतिम सामन्यात १४ धावांत दोन बळी घेणाऱ्या स्टार्कने केकेआरच्या विजेतेपदानंतर आपल्या कारकिर्दीविषयी मोठे विधान केले.

या ३४ वर्षीय वेगवान गोलंदाजाने फ्रँचायझी क्रिकेट खेळण्यासाठी कोणत्याही एका फॉरमॅटमधून बाहेर पडण्याचे संकेत दिले. मात्र त्याने याचा खुलासा अद्याप केला नाही. तरी २०२७ मध्ये होणार ५० षटकांचा विश्वचषकाच्या वनडे फॉरमॅटमध्ये तो दिसण्याची शक्यता आहे. सामन्यानंतर स्टार्क म्हणाला, ‘गेल्या नऊ वर्षांत मी ऑस्ट्रेलियन क्रिकेटला प्राधान्य दिले. शरीराला विश्रांती मिळावी आणि क्रिकेटपासून दूर पत्नीसोबत थोडा वेळ घालवण्याची संधी मिळावी म्हणून मी काही स्पर्धांमधून माघार घेतली. मी नक्कीच माझ्या कारकिर्दीच्या अखेरीस आहे. पुढील विश्वचषकासाठी बराच कालावधी असल्यामुळे कोणत्याही एका फॉरमॅट मी सोडण्याची शक्यता आहे आणि तो फॉरमॅट सोडला किंवा नाही तरी अनेक फ्रँचायझी क्रिकेटसाठी दरवाजे उघडतील.”